# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/05/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत नविन इमारत पोस्टे काटोल येथे दिनांक २२/०५/२०२३ चे ०९/४५ वा. ते १०/२० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– दिपक मनोहर टेकाडे, रा. रोहना ता. नरखेड** याने पोलीस स्टेशन नविन इमारतचे आवारात उभ्या ठेवलेल्या गाडीतुन एक इप्सन कंपनीचे प्रिंटर किंमती अंदाजे १४०००/– रूपयाचा चोरतांना दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक अशोक देशमुख पोस्टे काटोल वय ५५ वर्ष रा. पोस्टे काटोल यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पि.एस.आय. देशमुख पो.स्टे काटोल मो. नं. ९६६५६१५२९५ हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. भिवापूर :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर दुय्यम निबंधक ऑफीस भिवापुर येथे दिनांक १४/०९/२०२२ चे ००.०० पासुन ००.०० वा. पर्यत फिर्यादी नामे– मारोती रामकृष्ण शेटे, वय ५८ वर्षे, रा. फ्लॅट नं. ४१ रागमालीका कोहोसो १५/१६ सेक्टर ०५ नविन पनवेल रायगड याने चारगाव (मुग) येथे शेती श्री. माधव पंचमजी भानारकर यांच्या कडुन दिनांक १६/१२/२००६ ला विकत घेतली आहे. शेती ही श्री माधव पंचमजी भानारकर यांनी श्री आशिष ज्योताराव कोंटम्बरकर सौ. अनधा रविद्र ठाकरे व सौ. कुमुदिनी ज्योताराव कोंटम्बरकर याच्या कडुन २०/०४/२००५ ला विकत घेतली. फिर्यादीच्या निदर्शनात असे आले की त्याच्या शेतीची विक्री त्याच्या अनुपस्थितीत फिर्यादीच्या नावाचा उपयोग करून त्याच्या शेतीचे विक्री पत्र परक्या व्यक्तीने दि. १४/०९/२०२२ भिवापुर दुय्यम निबंधक ऑफीस येथे केलेली आहे.फिर्यादीच्या शेतीचे विक्री पत्र श्री. नितिन सुरेशराव भुजाडे यांनी केली आहे व साक्षीदार श्री सुरेश राजाराम भुजाडे व साक्षीदार हिमांशू यशवंत बुटके हे आहेत. विक्रीपत्रात विकत घेणाऱ्याचे व साक्षीदाराचे आधार नंबर व पॅन नंबर दिलेले आहेत फिर्यादीच्या शेतीची त्याच्या नावाचा दुरूपयोग करून अनोळखी माणसाने त्याच्या शेतीचे विक्री पत्र केलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ४१९, ४२०, ४६७, ४६८, ४७१ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. भस्मे सा. मो.न.९७६४९४६८०८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर